# सल्ला - सपु

सल्ला

सल्ला ही अशी गोष्ट आहे की देणाऱ्याने समोरून त्याची मागणी आली आहे का, आणि आपण तो सल्ला देण्यास पात्र आहोत का याचा विचार केला पाहिजे, नाहीतर सल्ला देणारा सचोटीने देत राहतो आणि समोरचा टाळत जातो.

न मागितलेली गोष्ट देत गेलो की तिचे महत्व आणि किंमत अल्प होते व ती टाकाऊ होते हे लक्षात आले पाहिजे, असा न मागता सल्ला देणारा माणूस सगळ्यांकडून त्याज्य समजला जातो व टाळला जातो, आणि अर्थात त्याच्या सल्ल्याला काही किंमत उरत नाही. समोरच्याची गरज न बघताच दिला गेलेला , बऱ्याच वेळा असा गळ्यात पडणारा सल्ला हा आजारापेक्षा औषध जहरी असाच होतो.

सल्ला दिला जातो तोच मुळी अनुभवातून, झेललेल्या कष्टातून, त्यागातून आणि प्राप्त संयमातून, मग हा असा मोलाचा ऐवज उगाच उधळत जाण्यात काय अर्थ आहे...

सल्ला आणि हुकुमाचा एक्का अगदी जपून ठेवावा आणि जर गरज पडलीच, तर एखाद्याच्या आयुष्याच्या डावात तो जरूर वटवावा व त्याचा सुयोग्य वापर करून घ्यावा/द्यावा.

हेच काय ते फळ त्याचे...

© सपु
www.saarthbodh.com

- सचिन कुलकर्णी